# भयमुक्त समाजातच स्त्री सुरक्षित राहील

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

आज शाळेत गेलेली मुलगी सुरक्षित घरी येईल की नाही यांची चिंता पालकांना असते. खेळायला जाणारी इवलीशी पोर कुणाच्यातरी वासनांधतेचा बळी ठरेल का हा प्रश्न सतत पालकांना भेडसावत असतो. महाविद्यालयाच्या वाटेवर आपल्या तरूण मुलीची छेड काढली

**'स्त्रियांवरील हिंसा' या विषयावर विविधांगी चर्चा**

तर काय करायचे या विवंचनेत अनेक पालक आहेत. नोकरीसाठी घराबाहेर पडणारी मुलगी नराधमांच्या विळख्यात अडकणार नाही ना या विचाराने अनेक पालक अस्वस्थ असतात. लग्न करून सासरी पाठवलेल्या मुलीला अत्याचार सहन करावे लागू नयेत यासाठी पालकांचा आटापिटा सुरू असतो. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रियांवरील हिंसा हा गंभीर सामाजिक प्रश्न बनला आहे. स्त्रियांवरील अत्याचार व त्यातून होणारी त्यांची हिंसा याबाबत समाजात घडणाऱ्या घटनांचा आलेख इतका वाढत आहे की, भविष्यात भयमुक्त समाज अस्तित्वात आला तरच स्त्री व पर्यायाने तिचे कुटुंब सुरक्षित असेल, असा विश्वास 'स्त्रियांवरील हिंसा' या विषयी चर्चेच्या व्यासपीठावर व्यक्त झाला.

## तुलना घरातूनच बंद व्हावी

सामाजिक कार्यकर्त्या तनुजा शिपूरकर म्हणाल्या, 'स्त्रियांवरील अत्याचार कमी करण्यासाठी प्रथम आपल्यामध्ये माणूसपणाची शिक्षण व्यवस्था रुजली पाहिजे. स्त्री पुरूषांमध्ये होणारा भेदभाव, त्यांच्यामध्ये कामावरून केली जाणारी तुलना घरापासूनच बंद झाली पाहिजे. स्त्री ही शोषित आहे हा गैरसमज मुलांच्या मनात भरण्यासाठी आपली कुटुंब व्यवस्था कारणीभूत आहे. घरातील मुलांना मुलींविषयी आदर करण्याची शिकवण दिली तर बरेच प्रश्न सुटतील.'



शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्यावतीने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये सावित्रीबाई फुले जयंती निमित्त 'स्त्रियांवरील हिंसा' या विषयावर खुली चर्चा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनीही या विषयावर आपली मते व्यक्त करत समस्येपेक्षा उपाय व मानसिक परिवर्तन याबाबत अनेक पर्याय खुले केले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

पवार अध्यासनाच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील म्हणाल्या, 'स्त्री व पुरुष हे समाजाचे घटक आहेत. स्त्री आज काही पुरूषांच्या विकृत नजरेपासून सुरक्षित नाही हा सामाजिक दोष आहे. काही समाजात स्त्रियांकडून पुरुषांवर अन्याय होतो हेही खरे आहे. त्यामुळे दोघांवरही अन्याय होणार नाही, दोघांनाही समान लेखले जाईल, यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.'

विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ.मेघा पानसरे म्हणाल्या, 'कुटुंब व्यवस्था समाजवादी आणि लोकशाहीवादी झाल्यास समाजामधील स्त्रियांवरील हिंसेचे आणि अत्याचाराचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.'

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'समाजामध्ये स्त्रियांवरील हिंसेचे प्रकार थांबवण्यासाठी सामाजिक जागृती निर्माण होणे गरजेचे आहे.'

लोकमत

# भावी पिढी सक्षमतेसाठी निर्भय वातावरण आवश्यक

## चर्चासत्रातील सूर : शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासनातर्फे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भावी पिढीला सक्षम व सुजाण घडविण्यासाठी निर्भय वातावरण निर्माण होणे गरजेचे आहे, असा सूर शुक्रवारी चर्चासत्रामध्ये उमटला. शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासनाच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त 'स्त्रियांवरील हिंसा' विषयावर खुली चर्चा आयोजित केली होती.

अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील म्हणाल्या, समाजाचे घटक जसे पुरुष आहेत, तसे स्त्रीयाही आहेत. दोघांवरही अन्याय होणार नाही, दोघांनाही समान लेखले जाईल, यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. सामाजिक कार्यकर्त्या तनुजा शिपूरकर म्हणाल्या, स्त्रियांवरील अत्याचार कमी करण्यासाठी माणूसपणाची शिक्षण व्यवस्था रुजली पाहिजे. घरातील कामे स्त्री-पुरुषांनी समान पद्धतीने वाटून घेतल्यास हिंसेचे प्रसंग उद्‌भवणार नाहीत.' डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, कुटुंबव्यवस्था समाजवादी व लोकशाहीवादी झाल्यास स्त्रियांवरील हिंसेचे व अत्याचाराचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. डॉ. अश्विनी पाटील यांनी आभार मानले.

### जागृतीची गरज

मुलींच्या शिक्षणाचा ध्यास म. फुले दाम्पत्याने घेतल्यानेच खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्रामध्ये क्रांती झाली. हिंसेचे प्रकार कमी होऊन ते शून्यावर आले पाहिजेत; यासाठी सामाजिक जागृती निर्माण होणे गरजेचे आहे, असे मत प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी व्यक्त केले.

# सावित्रीबाई फुले यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १८८ वी जयंती शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी उत्साहात साजरी झाली. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. भारती पाटील, डॉ. जगन कराडे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, आदी उपस्थित होते.

# पन्हाळा येथे आज अवकाश निरीक्षणाचे आयोजन

**कोल्हापूर :** कोल्हापूर व पन्हाळा परिसरातील विद्यार्थी आणि नागरिकांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्र, पन्हाळा येथे शनिवार (दि. ४) रोजी संध्याकाळी ७ ते १० या वेळेत आकाश निरीक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. कोल्हापूरच्या तुलनेत पन्हाळा येथील आकाश स्वच्छ व निरभ्र असते, त्यामुळे अवकाश निरीक्षणासाठी योग्य असे ठिकाण आहे. आकाश निरीक्षण शास्त्रीय पद्धतीने कसे करावे, आकाशातील, ग्रह, तारे, नक्षत्रे, राशी, तारका पुंज, नेबुली आणि आकाश गंगा कसे ओळखावेत आणि त्यांचे निरीक्षण कसे करावे, याबाबत याप्रसंगी मार्गदर्शन केले जाणार आहे. आकाश निरीक्षण कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

# मराठी पत्रकार दिनानिमित्त विद्यापीठात सोमवारी कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन, राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी पत्रकार दिनानिमित्त ६ जानेवारी रोजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात 'आपत्ती व्यवस्थापन आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेचे जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्या हस्ते उद्‌घाटन होईल. कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. यावेळी ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ प्रा. डॉ. जय सामंत यांचे 'नैसर्गिक आपत्ती - एक आव्हान' या विषयावर व्याख्यान होणार आहे. दुपारच्या सत्रात जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते 'आपत्ती व्यवस्थापन आणि सोशल मीडिया' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत पत्रकारिता विभाग प्रमुख डॉ. निशा पवार संपादित 'वुमेन इन रिजनल टेलिव्हिजन चॅनेल्स' या पुस्तकाचे व एम. जे. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या 'संज्ञापन' या रिसर्च जर्नलचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. निशा पवार यांनी केले आहे.